# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : १९/२०२२

तक्रारकर्ता, श्री.दिलिप रामचंद्र कदम
मु.पो.कोयनावेळे (घोटकॅम्प)
ता.पनवेल, जि.रायगड

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
मा.ग्रा.रो.ह.यो.
अव्वल कारकुन, तहसिल कार्यालय पनवेल
साईनगर रोड, तलाठी प्रशिक्षण केंद्र
ता.पनवेल, जि.रायगड

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा
मा.ग्रा.रो.ह.यो.
अव्वल कारकुन, तहसिल कार्यालय पनवेल
साईनगर रोड, तलाठी प्रशिक्षण केंद्र
ता.पनवेल, जि.रायगड

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १३/५/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ३१/८/२०२१ | ---- | ५/१०/२०२१ | ६/१२/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.३०/१२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये " माहिती देण्यात आलेली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १३/५/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक नारायण पाटील, महसूल सहायक, तहसिल कार्यालय पनवेल उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*"अ) कायेना पुर्नवसाहत अधिकारी यांचेकडील दि.२४/५/१९६६ चे वाटप पत्र तसेच*

*ब) मामलेदार पनवेल ता पनवेल यांचा हुकुमनामा क्रमांक RTS/WME/०५/० DATED २८.०५.१९६६ अन्वये मौजे कोयनावेळे पेंधर येथील जमिनीचे वाटप करण्यात आलेल्या बाबतची आदेशाची प्रमाणित नक्कल मिळणेबाबत."*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी जोडपत्र ब मध्ये "मागणी केलेली माहिती वेळेत प्राप्त न झाल्यामुळे" असे कारण नमूद करून प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.६/१२/२०२१ रोजी सुनावणी घेऊन, "*जन माहिती अधिकारी यांनी सहा. जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक, अभिलेख कक्ष यांचेमार्फत अभिलेख कक्षात शोध घेऊन सदरची माहिती तातडीने सदरच्या आदेशाच्या दिनांकापासून ०७ कार्यालयीन दिवसांमध्ये निशुल्क पुरविण्यात यावी. जी माहिती तलाठी कार्यालयाकडे असेल ती अपीलार्थी यांना पुरविण्याबाबत संबंधित तलाठी यांना कळविण्यात येवून तसे अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.*"असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक नारायण पाटील, महसूल सहायक, तहसिल पनवेल यांना याप्रकरणाची काहीच माहिती नाही. सबब त्यांना प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा पुढील सुनावणीस सादर करणेबाबत कळविणे उचित होईल. तसेच तक्रारकर्तास माहिती न देणेबाबत विद्यमान जन माहिती अधिकारी यांना कोणतेच कारण सांगता न आल्यामुळे, याबाबत तहसिलदार पनवेल यांनी पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर खुलासा सादर करणेबाबत कळविणे उचित होईल.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक नारायण पाटील, महसूल सहायक, तहसिल पनवेल यांना याप्रकरणाची काहीच माहिती नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील

सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. तक्रारकर्तास माहिती न देणेबाबत विद्यमान जन माहिती अधिकारी यांना कोणतेच कारण सांगता न आल्यामुळे, याबाबत **तहसिलदार पनवेल** यांनी पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून आयोगासमोर खुलासा सादर करावा.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२५/६/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.

**सही/-**
**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ मे, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तहसिलदार पनवेल,
तहसिलदार कार्यालय पनवेल,
साईनगर रोड, तलाठी प्रशिक्षण केंद्र,
ता.पनवेल जि.रायगड

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक नारायण पाटील,
महसूल सहायक, तहसिलदार कार्यालय पनवेल,
साईनगर रोड, तलाठी प्रशिक्षण केंद्र,
ता.पनवेल जि.रायगड

## विवेचन

उपरोक्त आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी व तहसिलदार पनवेल यांना आदेशित करण्यात आले होते. सदर प्रकरणाची सुनावणी आज दि.२५/६/२०२५ रोजी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक नारायण पाटील, महसूल सहायक, तहसिल पनवेल **तसेच** तहसिलदार पनवेल अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

आयोगाने दि.१३/५/२०२५ च्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक पाटील यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये खुलासा सादर करण्याचे आदेश दिले होते. तथापि सुनावणीची सूचना प्राप्त होऊनही ते अनुपस्थित आहेत तसेच त्यांनी याबाबत आयोगास लेखी खुलासा देखील सादर केलेला नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक नारायण पाटील, महसूल सहायक, तहसिलदार कार्यालय पनवेल यांना आयोगाने दि.१३/५/२०२५ च्या आदेशान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम २० (१) अन्वये खुलासा सादर करण्याचे आदेश दिले होते. आजच्या सुनावणीची सूचना प्राप्त होऊनही ते अनुपस्थित आहेत तसेच त्यांनी याबाबत आयोगास लेखी खुलासा देखील सादर केलेला नाही. त्यांनी माहिती अधिकारांतर्गत करावयाच्या कार्यवाहीस महत्त्व दिल्याचे दिसून येत नाही. त्यांना दि.१३/५/२०२५ च्या आदेशातील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये दिलेली कारणे दाखवा नोटीस कायम करण्यात येत आहे. त्यानुसार त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये रु.२५०००/- (अक्षरी रु.पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लादण्यात येत आहे.

सदर रक्कम त्यांचे वेतनातून १ मासिक हप्त्यात वसूल करुन लेखाशीर्ष क्र. ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० - इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०0१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करावी. या बाबतची कार्यवाही करुन (रक्कम जमा केलेल्या चलनाच्या छायांकित प्रतीसह व्दितीय अपील क्रमांक स्पष्ट नमूद करून) पूर्तता अहवाल **तहसिलदार पनवेल** यांनी आयोगास तात्काळ सादर करावा.

२) तक्रारकर्ता यांना अद्यापपर्यंत माहिती का देण्यात आली नाही, याचा खुलासा विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक पाटील आयोगास मागील सुनावणीस करू न शकल्याने याबाबत **तहसिलदार पनवेल** यांना आजच्या सुनावणीस उपस्थित राहून खुलासा सादर करणेबाबत कळविले होते. तथापि आजच्या सुनावणी सूचना प्राप्त होऊनसुध्दा ते सुनावणीस अनुपस्थित आहेत. त्यासाठी त्यांनी आयोगाची पुर्वपरवानगी घेतलेली नाही. सबब पुढील सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी **तहसिलदार पनवेल** यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम १८ (३) (क) अन्वये आयोग कार्यालयाने पनवेल शहर पोलीस ठाणे यांचेमार्फत समन्सची बजावणी करावी.

३) प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.६/८/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**सही/-**
**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.

Comp-३

दिनांक : २५ जून, २०२५ . **कोंकण खंडपीठ**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

१) सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग (मुख्यालय), १३ वा मजला,
नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

२) उप सचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ,
कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

३) तहसिलदार पनवेल,
तहसिलदार कार्यालय पनवेल, साईनगर रोड,
तलाठी प्रशिक्षण केंद्र, ता.पनवेल जि.रायगड

४) आस्थापना अधिकारी / आहरण व संवितरण अधिकारी,
तहसिलदार कार्यालय पनवेल, साईनगर रोड,
तलाठी प्रशिक्षण केंद्र, ता.पनवेल जि.रायगड

५) विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक नारायण पाटील,
महसूल सहायक, तहसिलदार कार्यालय पनवेल,
साईनगर रोड, तलाठी प्रशिक्षण केंद्र, ता.पनवेल जि.रायगड

## विवेचन

सदर सुनावणीस तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.शिवाजी सुर्यवाड, महसुल सहायक, तहसिलदार कार्यालय पनवेल व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.दिपक पाटील सध्या कार्यरत-महसुल सहायक, तहसिलदार कार्यालय उरण आणि विद्यमान प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.संजय भालेराव, नायब तहसिलदार, तहसिलदार कार्यालय पनवेल उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

सुनावणीस तहसिलदार पनवेल यांचे प्रतिनिधी श्री.संजय भालेराव, नायब तहसिलदार हे उपस्थित आहेत. तहसिलदार यांना मा.मंत्री महसूल यांचेकडे सुनावणीसाठी उपस्थित रहावे लागल्याने ते आयोगाकडील आजच्या सुनावणीस उपस्थित राहू शकले नाही असे निवेदन त्यांनी केले. त्यांच्या या निवेदनाची नोंद घेण्यात आली.

श्री.विजय पाटील, तहसिलदार पनवेल यांनी त्यांचा दि.२५/६/२०२५ रोजीचा लेखी अहवाल आयोगास सादर केला त्यामध्ये नमूद केले आहे की, तक्रारकर्ता यांनी कोयना पुर्नवसाहत अधिकारी यांचेकडील दि.२४/५/१९६६ चे वाटप पत्र तसेच तहसिलदार पनवेल यांचा हुकूमनामा क्र.RTS/WME/०५/० DATED २५/०८/१९६६ अन्वये मौजे कोयनावळे व पेंधर येथील जमिनीचे वाटप करण्यात आलेल्याबाबतची आदेशाची प्रमाणीत प्रत मागणी केली आहे. सदर कोयना पुर्नवसाहत अधिकारी यांचे कार्यालय हे वेगळे असुन वाटपपत्राची मुळ संचिका ही कोयना पुर्नवसाहत यांचे कार्यालयाच्या अधिकारात असल्याने सदर संचिका या कार्यालयात उपलब्ध नाही. तसेच तहसिल कार्यालय पनवेल, ता.पनवेल यांचेमार्फत कोणतेही वाटप करण्यात येत नाही. मौजे कोयनावेळे व पेंधर येथील जमिनीचे वाटप करण्यात आलेल्याबाबतची आदेशाची प्रमाणीत प्रत शोध घेऊन या कार्यालयात उपलब्ध होऊ शकली नाही. वरील सर्व वस्तुस्थिती पहाता, अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती कोयना पुर्नवसाहत अधिकारी यांचेकडुन प्राप्त करून घेणे आवश्यक आहे असे तहसिलदार पनवेल यांनी त्यांचे अहवालात नमूद केले आहे.

माहितीचा अधिकार अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ६ (३) अन्वये जर एखाद्या अर्जदार यांने मागणी केलेली माहिती आपल्या सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित नसेल तर अशास्थितीत ती माहिती ज्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असेल अशा सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांचेकडे सदर माहिती अर्ज प्राप्त झालेपासून ५ दिवसांत हस्तांतरित करणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी अशा रितीने माहिती अर्ज हस्तांतर करू शकले नाही तर त्यानंतर ज्या अधिकारी यांचेकडे माहिती अर्ज आलेला आहे त्याची ही जबाबदारी निर्माण होते की, ती माहिती संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाकडून प्राप्त करून अर्जदारास उपलब्ध करून द्यावी. या विशिष्ट प्रकरणी तक्रारकर्ता यांनी दि.३१/८/२०२१ रोजी तहसिलदार कार्यालय पनवेल जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती अर्ज सादर केला. जर ही माहिती पनवेल तहसिलदार कार्यालयाकडे उपलब्ध नाही तर असा माहिती अर्ज ५ दिवसांत पुर्नवसन अधिकारी कोयना यांचेकडे हस्तांतरित करणे आवश्यक होते. ती जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची होती त्यामुळे ४ वर्षाच्या कालावधीनंतर आयोगास अशा रितीचा अहवाल सादर करणे, ही तहसिलदार पनवेल यांची कार्यवाही अयोग्य व कायद्याच्या विरूध्द आहे. त्यामुळे त्यांचा खुलासा/अहवाल स्विकारता येत नाही.

सुनावणीस उपस्थित असलेल्या श्री.संजय भालेराव, नायब तहसिलदार यांनी निवेदन केले की, सन २००५ मध्ये जुने तहसिलदार पनवेल कार्यालयात पुराचे पाणी घुसल्यामुळे त्यांचा काही अभिलेख त्यामध्ये भिजलेला, जीर्ण व अवाचनीय झालेला आहे. त्या अभिलेखामध्ये तक्रारकर्ता यांनी मागणी केलेल्या माहितीचा समावेश असण्याची शक्यता आहे. तथापि असा भिजलेला जीर्ण व अवाचनीय अभिलेखाचा पंचनामा करण्यात आला काय व अशा पंचनाम्या मध्ये तक्रारकर्ता यांनी मागणी केलेल्या अभिलेखाचा समावेश आहे का याबाबत आपण माहिती घेऊन खुलासा करू असे श्री.भालेराव यांचेतर्फे सांगण्यात आले. श्री.भालेराव यांच्या या निवेदनाची नोंद घेण्यात आली.

तहसिलदार पनवेल यांचा लेखी खुलासा व उपस्थित नायब तहसिलदार श्री.संजय भालेराव यांचे मौखिक निवेदन या दोन्ही बाबींचा एकत्रित विचार केला तर असे दिसून येते की, तक्रारकर्ता यांना मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासंदर्भात अद्यापपर्यंत तहसिलदार पनवेल कार्यालयाने कोणतीही पावले उचलली नाहीत. ज्या कार्यालयात अभिलेख उपलब्ध आहे तेथून सुध्दा प्राप्त करून माहिती पुरविण्यासाठी कार्यवाहीबाबत पत्रव्यवहार केल्याचा दिसून येत नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तहसिलदार पनवेल यांनी, अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती ज्या कार्यालयात उपलब्ध असण्याची शक्यता आहे त्या कार्यालयाकडून ती प्राप्त करून तक्रारकर्ता यांना पुढील ३० दिवसांत जलद डाकेने विनामूल्य पुरवावी. तसा अहवाल आयोगास पुढील सुनावणीस सादर करावा. अशी माहिती प्राप्त करण्यासाठी जन माहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ५ (४) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करू शकतात.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१६/९/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ६ ऑगस्ट, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
तहसिलदार पनवेल,
तहसिलदार कार्यालय पनवेल, साईनगर रोड,
तलाठी प्रशिक्षण केंद्र, ता.पनवेल जि.रायगड